दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९५ वा ● गुरुवार, ता. १५ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## तिसऱ्या मराठी राजभाषा साहित्य संमेलनाची जय्यत तयारी

**पणजी । प्रभाकर ढगे**

'मराठी असे आमुची मायबोली' आणि गोमंतक मराठी अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे गोवा मराठी राजभाषा साहित्य संमेलन यंदा माशेल येथील नोनुज व्हिलेज या वातानुकूलित सभागृहात रविवार, ता. १८ जानेवारी २०२६ रोजी भरगच्च कार्यक्रमांनी साजरे होणार आहे. दिवसभर चालणाऱ्या या संमेलनात विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद मराठीप्रेमींना घेता येणार असून संमेलनाची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. या तिसऱ्या राजभाषा साहित्य संमेलनाचे उद्घाटन माजी मंत्री तथा प्रियोळचे आमदार गोविंद गावडे यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत गावस हे संमेलनाध्यक्ष असणार आहेत. कार्याध्यक्ष म्हणून नोनू नाईक, प्रमुख कार्यवाह डॉ. मधू घोडकीरेकर तर स्वागताध्यक्ष म्हणून ॲड. विनायक नार्वेकर काम पाहणार आहेत. सकाळी ८.३० वाजता सातेरी केळबाई दिंडी पथक, वाळपई यांची दिंडी माशेल येथील श्री देवकीकृष्ण मंदिरापासून निघून संमेलनस्थळी पोहोचेल. त्यानंतर श्री शांतादुर्गा महिला संघटना, वरगाव यांचे स्वागतगीत तसेच श्री देवकीकृष्ण कालोत्सव मंडळाकडून गणेशवंदना सादर केली जाणार आहे. सकाळी १०.४५ ते १२.३० या वेळेत उद्घाटन समारंभ होणार असून यावेळी तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत पहिला परिसंवाद होणार असून विषय आहे 'मराठी शिक्षकांपुढील आव्हाने'. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. स्नेहा म्हांबरे असतील. सहभागी वक्ते म्हणून सोमनाथ पिळगावकर (उच्च माध्यमिक), प्रांजल च्यारी (प्राथमिक), देवेंद्र साठे (माध्यमिक) आणि प्रा. डॉ. निता तोरणे (महाविद्यालय विभाग) उपस्थित राहणार आहेत. दुपारी १.३० ते २.३० या वेळेत भोजनावकाश ठेवण्यात आला आहे. भोजनानंतर दुपारी २.३० ते ३.३० या वेळेत दुसरा परिसंवाद होणार असून विषय 'मराठी राजभाषा लढ्याची दिशा' असा आहे. या परिसंवादाचे अध्यक्ष राष्ट्रीय पुरस्कार विजेते शिक्षक व पर्यावरण चळवळीतील कार्यकर्ते रमेश गावस असतील. ॲड. वल्लभ देसाई, सायली गर्दे, ॲड. महेश राणे आणि डॉ. दिनेश जल्मी हे सहभागी वक्ते असतील. दुपारी ३.३५ ते सायंकाळी ५.०० या वेळेत प्रमोद कारापुरकर यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. यामध्ये पूजा गावकर, आशिका देसाई, रेखा डायस, अशोक लोटलीकर, अलिशा गडेकर नाईक, गौरीश नाईक, संजय घुंग्रेटकर, वर्षा प्रभूगावकर, श्रीपाद देसाई, मेधा जाधव, विशाल गावास, संकेत पाडलोस्कर, सुनिता फडणीस, यतीन फाटक, माधुरी उसगावकर, उमेश परवारा, बबिता नार्वेकर, सोनाली पेडणेकर, राजेश नार्वेकर, रामदास भगत तसेच बक्षिसविजेते कवी सहभागी होणार आहेत. सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत समारोप कार्यक्रम होईल. यावेळी मराठी राजभाषा संमेलनाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या निबंध लेखन व कविता लेखन स्पर्धांचे बक्षीस वितरण संमेलनाध्यक्षांच्या हस्ते करण्यात येणार आहे. ठराव वाचनाने संमेलनाचा समारोप होणार आहे. संपूर्ण संमेलनाचे नियोजन केवळ मराठी राजभाषा हा केंद्रबिंदू ठेवून करण्यात आले असून सर्व मराठी राजभाषा प्रेमींनी दिवसभर उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन आयोजन समितीचे संयोजक प्रकाश य. भगत व कार्यवाह डॉ. मधू घोडकीरेकर यांनी केले आहे.



## पत्रकारांचा आरोग्य विमा प्रमाणपत्राने सन्मान

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

रोटरी क्लब ऑफ बेळगाव साऊथ तर्फे पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांचा आरोग्य विमा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम टिळकवाडी येथील लायन्स भवन येथे सोमवार, ता. १२ जानेवारी रोजी पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ पत्रकार मनीषा सुभेदार उपस्थित होत्या. रोटरी साऊथचे अध्यक्ष डॉ. गोविंद मिसाळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य हा असा अनमोल विशेषाधिकार आहे, ज्याशिवाय कोणताही देश टिकू शकत नाही. रोटरी आणि पत्रकारितेची मूल्ये एकमेकांच्या अत्यंत जवळची आहेत. फेक न्यूज व अफवांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीच्या युगात तथ्यांची पडताळणी करणे हे पत्रकारांसमोर मोठे आव्हान आहे. पत्रकार हा आवाज नसलेल्यांचा आवाज असून लोकशाहीला आवश्यक असलेला संतुलित दृष्टिकोन देण्याचे काम करतो. 'ब्रेकिंग न्यूज'ची घाई व २४ तासांच्या बातम्यांच्या चक्राचा दबाव सहन करूनही सत्याचा शोध घेणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करणे हे रोटरी साऊथसाठी गौरवास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. इव्हेंट चेअरमन जगदीश कारजार यांनी पत्रकारांना आरोग्य विम्यातून मिळणाऱ्या लाभांची माहिती दिली. रोटरी व्यावसायिक सेवेचे संचालक सतीश कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मनीषा सुभेदार यांनी पत्रकारांना काम करताना येणाऱ्या अडचणी व परिस्थितीची माहिती देत रोटरी क्लब ऑफ बेळगाव साऊथच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांना आरोग्य विमा प्रमाणपत्र, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकार श्रीकांत काकतीकर, ज्ञानेश्वर पाटील, परशराम पालकर, सुहास हुद्दार, अक्षता नाईक, महेश काशीद, अनंत कुचेकर, संजय चौगुळे, सुभाणी मुल्ला, दीपक सुतार, सुनील चिगुळकर, विवेक गिरी, प्रसन्ना कुलकर्णी, रुपा कुलकर्णी आदींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार सचिव प्रणव पित्रे यांनी मानले.

## महापालिका निवडणुकीत 'PADU'ची एंट्री; ठाकरेंचा आक्षेप

**मुंबई । रयत समाचार**

मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या PADU प्रिंटींग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट मशीनमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. ईव्हीएम बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून हि मशीन वापरण्यात येणार असल्याची माहिती समोर आल्यानंतर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी या निर्णयावर आक्षेप नोंदवला आहे. याच पार्श्वभूमीवर हे मशीन नेमकं काय आहे आणि ते कसं काम करतं, याबाबत माहिती स्पष्ट झाली आहे. निवडणूक आयोगाने आणलेले हे मशीन ईव्हीएमचे पर्यायी किंवा बॅकअप यंत्र असून ते सरसकट वापरले जाणार नाही, असे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी स्पष्ट केले. ईव्हीएम अचानक बंद पडल्यास किंवा तांत्रिक अडचण आल्यासच अपवादात्मक (इमरजन्सी) परिस्थितीत हि मशीन वापरण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (BEL) निर्मित M3A ईव्हीएम यंत्रणा वापरण्यात येणार आहे. मतमोजणी करताना कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडणे आवश्यक असते. मात्र, या प्रक्रियेदरम्यान तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास, मतांची माहिती मिळवण्यासाठी ने विकसित केलेल्या युनिटचा वापर करण्यात येतो. हे युनिट कंट्रोल युनिटशी जोडून मतांची माहिती डिस्प्ले व प्रिंट स्वरूपात उपलब्ध करून देते. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मुंबई महानगरपालिकेला एकूण १४० मशीन प्राप्त झाल्या असून त्या केवळ आपत्कालीन परिस्थितीतच वापरण्यात येणार आहेत. मात्र, ईव्हीएमला नवीन यंत्र जोडण्याबाबत आधी माहिती का देण्यात आली नाही, असा सवाल उपस्थित करत राज ठाकरे यांनी या प्रक्रियेबाबत पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित केला आहे. यावरून निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेबाबत राजकीय चर्चेला वेग आला आहे.



## इराणमध्ये तणाव; भारतीय नागरिकांना तातडीने देश सोडण्याच्या सूचना

**तेहरान । रयत समाचार**

इराणमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय अस्थिरता, हिंसक निदर्शने आणि ढासळलेल्या सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आपल्या नागरिकांसाठी महत्त्वाची सल्लागार सूचना जारी केली आहे. तेहरान येथील भारतीय दूतावास यांनी इराणमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांना उपलब्ध साधनांचा वापर करून शक्य तितक्या लवकर देश सोडण्याचे आवाहन केले आहे. या सूचनेत व्यावसायिक, विद्यार्थी, तीर्थयात्री, उद्योजक तसेच पर्यटक यांचा समावेश आहे. इराणमधील बदलती परिस्थिती लक्षात घेता, व्यावसायिक उड्डाणांसह उपलब्ध असलेल्या कोणत्याही वाहतूक साधनांचा वापर करून इराण सोडण्याचा सल्ला देण्यात आला आहे. ही सूचना ५ जानेवारी २०२५ रोजी भारत सरकारने दिलेल्या सल्ल्याचा विस्तार असल्याचे दूतावासाने स्पष्ट केले आहे. दरम्यान,



इराणमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेकडूनही कारवाईची शक्यता व्यक्त करण्यात येत असून कतारमधील एअरबेस कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारतीय दूतावासाने इराणमधील सर्व भारतीय नागरिक व पीआयओंना अत्यंत सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. कोणत्याही प्रकारच्या निदर्शनांपासून, गर्दीच्या किंवा संवेदनशील ठिकाणांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच परिस्थितीबाबत ताज्या घडामोडी जाणून घेण्यासाठी स्थानिक माध्यमांवर लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी पासपोर्ट, ओळखपत्रे व प्रवासाशी संबंधित सर्व कागदपत्रे नेहमी सोबत ठेवावीत, असेही दूतावासाने स्पष्ट केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी भारतीय दूतावासाने संपर्क क्रमांकही जाहीर केले असून +९८९१२८१०९११५, +९८९१२८१०९१०९, +९८९१२८१०९१०२ आणि +९८९३२१७९३५९ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनांदरम्यान आतापर्यंत सुमारे दोन हजार लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून हा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. देशातील बिघडलेली आर्थिक स्थिती व सामाजिक निर्बंधांमुळे ही आंदोलने तीव्र झाल्याचे सांगण्यात येत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून उपजिल्हा रुग्णालयाची झाडाझडती

**पाथर्डी । नितीन गटाणी**

येथील उपजिल्हा रुग्णालयास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज अचानक भेट देत रुग्णालयातील सोयी-सुविधा व एकूण कार्यप्रणालीचा बारकाईने आढावा घेतला. यावेळी त्यांनी रुग्णालयातील स्वच्छता, वैद्यकीय विभागांची कार्यक्षमता, रुग्णांच्या सोयी-सुविधा तसेच उपलब्ध वैद्यकीय उपकरणांची तपासणी केली. रुग्णालयाचे इलेक्ट्रिकल ऑडिट व फायर ऑडिट करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय परिसरातील स्वच्छतेची पाहणी करून स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण राखण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर ओपीडी कक्ष, आंतररुग्ण विभाग, महिला व बालरोग विभाग, प्रसूतीगृह, प्रयोगशाळा, लसीकरण व औषध वितरण केंद्र तसेच आपत्कालीन सेवांचा आढावा घेतला. रुग्णांना वेळेत व दर्जेदार उपचार मिळत आहेत का, आवश्यक औषधे व उपकरणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत का, याची त्यांनी माहिती घेतली. वैद्यकीय उपकरणांची स्थिती, वापर व देखभाल याबाबत समाधान व्यक्त करत काही ठिकाणी सुधारणा करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना कोणतीही अडचण येऊ नये, त्यांना सुलभ, जलद व दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, यासाठी सर्व यंत्रणा अधिक सक्षमपणे कार्यरत ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. मुला-मुलींच्या जन्मदरातील तफावत लक्षात घेता लिंग गुणोत्तरासाठी अधिक जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासनाच्या विविध योजनांतर्गत मिळणाऱ्या अनुदान व सवलतींबाबत ऑनलाईन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. या पाहणीवेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले यांनी सर्व माहिती दिली. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, डॉ. मनीषा खेडकर, डॉ. विशाल वाघ, डॉ. संदीप सुरवसे, डॉ. संगीता खुराणा उपस्थित होते. त्यांनी रुग्णालयातील दैनंदिन कामकाज, रुग्णसंख्या, उपचार पद्धती व अडचणींबाबत जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली. रुग्णालयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या अत्याधुनिक डायलिसिस सेंटरची पाहणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. रुग्णालयाच्या वतीने प्रसूतीगृह प्रशस्त व आधुनिक करणे, इमारत दुरुस्ती, रंगकाम, अंतर्गत रस्ते, पाईपलाईन, बेसिन व स्वच्छतागृह दुरुस्ती, वयोवृद्ध व अपंग रुग्णांसाठी पाश्चिमात्य पद्धतीची स्वच्छतागृहे उभारणे, खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळ्या बसविणे, प्रवेशद्वारावर रुग्णालयाच्या नावाची कमान उभारणे आदी मागण्या मांडण्यात आल्या. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक कार्यक्षम होऊन ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार उपचार मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. उपजिल्हा रुग्णालयात प्रसूती झाल्यानंतर तात्काळ जन्म दाखले देण्यात येतात. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जन्म दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी हेमलता वराडे, आदिनाथ भोईटे, गणेश विधाते, सारिका विधाते, शैला खाडे, भाऊसाहेब कदम, अल्ताफ शेख, निशा राठोड, सारिका खेडकर, उत्तम गिरी आदी अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



## महिलांना मकर संक्रांतीची 'विशेष भेट'

**मुंबई । रयत समाचार**

मकर संक्रांतीनिमित्त महिलांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्यभर 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात येत आहेत. रजोनिवृत्ती (मेनोपॉज) काळात महिलांना भेडसावणाऱ्या शारीरिक व मानसिक आरोग्य समस्यांवर वेळेत व शास्त्रीय उपचार मिळावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मकर संक्रांतीपासून ता. १४ जानेवारी २०२६रोजीपासून सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये दर बुधवारी यासाठी विशेष बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) सुरू केला जाणार आहे. रजोनिवृत्तीच्या काळात संप्रेरकांतील बदलांमुळे झोपेचे विकार, चिडचिड, नैराश्य, सांधेदुखी, अस्थिसुषिरता (ऑस्टिओपोरोसिस), वजन वाढ, हृदयविकाराचा धोका अशा विविध समस्या महिलांमध्ये आढळतात. मात्र अनेकदा या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते. हे लक्षात घेऊन महिलांसाठी स्वतंत्र व समर्पित आरोग्यसेवा देण्यासाठी मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, महापालिका रुग्णालये तसेच निवडक ग्रामीण रुग्णालयांमध्ये हे क्लिनिक कार्यान्वित केले जाणार आहेत. या क्लिनिकमध्ये महिलांची सविस्तर वैद्यकीय तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधोपचार, समुपदेशन तसेच आहार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये मानसिक आरोग्य समुपदेशन, कॅल्शियम व जीवनसत्त्व 'ड' संदर्भातील उपचार तसेच आवश्यक तपासण्यांची माहिती दिली जाणार आहे. या विशेष ओपीडीचा लाभ महिलांनी घ्यावा व रजोनिवृत्ती काळातील लक्षणांबाबत कोणताही संकोच न ठेवता पुढे यावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे. या संदर्भात कुटुंब कल्याण व माताबाल संगोपन विभागाचे अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे यांनी सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिकांचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी तसेच बृहन्मुंबई महापालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. मेनोपॉज क्लिनिकला येणाऱ्या महिला रुग्णांची स्वतंत्र नोंद ठेवणे, मासिक आकडेवारी परिमंडळ स्तरावर पाठवणे आणि या क्लिनिकची प्रभावी जनजागृती करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## भाविकांची पिळवणूक करणाऱ्या लटकुंवर कारवाईचे आदेश

**शनी शिंगणापूर । रयत समाचार**

शनी शिंगणापूर येथे देशभरातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची एजंटांकडून (लटकू) होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक व असुविधा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १५२ (१)अन्वये शिंगणापूर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. शनिशिंगणापूर हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र शनिशिंगणापूर पोलीस ठाणे व नेवासा तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मंदिर परिसर तसेच गावाच्या बाहेरील रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती (एजंट/लटकू) भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच चढ्या दराने पूजा साहित्य खरेदी करण्यास भाग पाडतात. विरोध केल्यास दमदाटी व शिवीगाळ केल्याचे प्रकारही घडत आहेत. सन २०२५ मध्ये अशा स्वरूपाच्या तब्बल ५३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यामुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता असल्याने हे आदेश काढण्यात आले आहेत.

**जारी करण्यात आलेले प्रमुख आदेश वाहने अडविण्यास मनाई :** शिंगणापूर गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे, प्रवेश मार्ग अथवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना किंवा त्यांच्या वाहनांना थांबविणे, अडविणे अथवा त्यांना विशिष्ट ठिकाणी जाण्यास सक्ती करणे यास पूर्णतः प्रतिबंध करण्यात आला आहे.

**खरेदीची सक्ती नको :** भाविकांना कोणत्याही विशिष्ट दुकानातून खरेदी करणे, निवास किंवा अन्य व्यवहार करण्यास भाग पाडू नये. याबाबत भाविकांना पूर्ण स्वातंत्र्य राहील. तोटयागिरीस प्रतिबंध : कोणत्याही खासगी व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये.

**मध्यस्थीस मनाई :** भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली कोणत्याही प्रकारची मध्यस्थी करण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशांचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या आदेशामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना दिनांक २८ जानेवारी २०२६ पर्यंत उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आपली बाजू किंवा हरकत नोंदवण्याची मुभा देण्यात आली आहे. या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना देण्यात आले असून, भाविकांची कोणतीही पिळवणूक सहन केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.





# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५–२६



# ‘आम्ही जाणार मतदानाला, तुम्हीपण चला’

## सकट परिवाराचा मतदार जनजागृती उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिका निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढविणे तसेच नागरिकांमध्ये लोकशाही प्रक्रियेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहिर डॉ. अण्णा भाऊसाठे पुरस्कारप्राप्त सुनिल सकट व त्यांच्या कुटुंबीयांनी आगळा-वेगळा उपक्रम राबवत मतदार जागृती केली.



मतदार ओळखपत्र हातात धरून संपूर्ण कुटुंबीयांनी एकत्रित सेल्फी काढत ‘आम्ही जाणार मतदानाला, तुम्हीपण चला!’ असा संदेश दिला. या उपक्रमाच्या माध्यमातून सकट परिवाराने नालेगाव परिसरात नागरिकांशी संवाद साधत मतदान हा केवळ अधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा संविधानिक हक्क व नैतिक कर्तव्य असल्याचे ठामपणे मांडले. गुरुवार, ता. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रत्येकाने घराबाहेर पडून आपला हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी वंदना सकट, आरती सकट, प्रसाद सकट, सुशिलाबाई सकट, अरुण सकट, सुधीर सकट आदी कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी बोलताना सुनिल सकट म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून तिची खरी ताकद मतदारांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे. महापालिका निवडणूक हा केवळ मतदानाचा दिवस नसून तो लोकशाहीचा उत्सव आहे. शहराच्या विकासासाठी सशक्त व जबाबदार नेतृत्व निवडण्यासाठी प्रत्येक नागरिकाने हिरीरीने मतदान प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. मतदान न करणे म्हणजे स्वतःच्या हक्कांपासून वंचित राहण्यासारखे असून मतदानातूनच शहर, परिसर व पुढील पिढीच्या विकासाचा मार्ग ठरतो. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत निर्णय घेणारे प्रतिनिधी निवडण्याची ताकद मतदारांकडे आहे. त्यामुळे एकही मत वाया जाऊ नये, असे सांगत लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मतदानासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

# मतदानासाठी ग्राह्य ओळखपत्रांची यादी जाहीर

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेची निवडणूक पार पडत आहे. ज्या शहरात आपण राहतो आणि जे शहर आपल्याला घडवते, त्या शहराप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. १५ जानेवारी २०२६ रोजी लोकशाहीच्या कर्तव्याचे भान ठेवून मतदानातून शहराच्या विकासात हातभार लावावा. मतदान प्रक्रियेची सर्व तयारी पूर्ण असून मतदान केंद्रांवर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नव्या वर्षात मतदानाच्या माध्यमातून शहराला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचा संकल्प करूया. मतदान केंद्रांवर आम्ही तुमची वाट पाहत आहोत,'' असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे. अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी सर्व विभाग, कक्ष तसेच अधिकारी-कर्मचारी सज्ज असून मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, मदतनीस व सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदारांनी मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठी मतदान केंद्रांवर उपस्थित राहावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंडे, स्वीप नोडल अधिकारी तथा साहाय्यक आयुक्त अशोक साबळे, साहाय्यक आयुक्त सपना वसावा, मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन व प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे यांनी केले आहे.



**राज्य निवडणूक आयोगाने मतदानासाठी ग्राह्य धरलेली ओळखपत्रे पुढीलप्रमाणे असून मतदारांनी यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे : १) भारताचे पारपत्र (पासपोर्ट), २) आधार ओळखपत्र, ३) वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), ४) आयकर विभागाचे पॅन ओळखपत्र (पॅन कार्ड), ५) केंद्र/राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिलेले छायाचित्रासह ओळखपत्र, ६) राष्ट्रीयकृत बँक किंवा टपाल खात्याचे छायाचित्र असलेले पासबुक, ७) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला छायाचित्रासह दिव्यांग प्रमाणपत्र, ८) मनरेगा योजनेखालील छायाचित्र असलेले जॉब कार्ड, ९) निवृत्त कर्मचारी किंवा त्यांच्या विधवा/अवलंबितांचे छायाचित्र असलेली निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे, १०) लोकसभा/राज्यसभा तसेच विधानसभा/विधानपरिषद सचिवालयाने दिलेले अधिकृत ओळखपत्र, ११) स्वातंत्र्यसैनिकांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र, १२) केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे छायाचित्रासह स्मार्ट कार्ड**

# आदर्श विद्या मंदिरचा विज्ञानमंचावर डंका

## कारभारी लोणारी यांचा गणित-विज्ञान प्रदर्शनात तिसरा क्रमांक

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

आदर्श विद्या मंदिर, शेवगाव येथील प्रयोगशील व नवोन्मेषी अध्यापक तसेच आर.एस.पी. ॲण्ड सी.डी. अधिकारी कारभारी बाबुराव लोणारी यांनी आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत अहिल्यानगर जिल्हास्तरीय ५३ व्या गणित-विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक शिक्षक गटात तृतीय क्रमांक पटकावून संस्थेचा व शेवगाव तालुक्याचा गौरव वाढविला आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभाग व जिल्हा गणित-विज्ञान अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनातील यशाबद्दल जामखेड येथील नागेश विद्यालयात झालेल्या गौरव समारंभात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड व प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते लोणारी यांना सन्मानपत्र, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या यशाला भक्कम पार्श्वभूमी असून



यापूर्वी शेवगाव तालुकास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनात लोणारी यांनी माध्यमिक शिक्षक गटात प्रथम क्रमांक पटकावला होता. त्या प्रदर्शनात गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान झाला होता. त्याच प्रदर्शनातून त्यांची जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली आणि तेथेही त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली. शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभवाच्या बळावर कारभारी लोणारी यांनी तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या अध्यापनात शास्त्रीय दृष्टिकोन, प्रयोगशीलता व नवकल्पनांचा समावेश असून अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचविले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा जयश्री रविराज गडाख, सचिव रविराज गडाख, मुख्याध्यापक संजय कल्हापूरे यांच्यासह मुकुंद अंचवले, राजेंद्र झिने, पंढरीनाथ खाटीक, बाबासाहेब शिंदे, बबनराव गायकवाड, रामनाथ सकट, हरिदास गोरवे, अनिल दरंदले, बाळासाहेब जाधव, प्रफुल्लता विरकर, लिला सागडे, सविता म्हस्के, शारदा बुधवंत, कविता काळे, अलका कुटे तसेच तालुक्यातील गणित-विज्ञान शिक्षकांनी लोणारी यांचे अभिनंदन केले.




**मनपा सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरातील विविध केंद्रांवर मतदान साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी मिळालेले मतदान साहित्य तपासून घेताना निवडणूक कर्मचारी तसेच हे साहित्य आपल्या-आपल्या मतदान केंद्रांकडे नेताना दिसत आहेत.**
(छाया: राजू खरपुडे, नगर)

# भरदिवसा बिबट्याचा धुमाकूळ; नागरिकांत भीतीचे सावट

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अरणगाव दुमाला परिसरात भरदिवसा बिबट्याने थेट मानवी वस्तीच्या सान्निध्यात हल्ला केल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मेंढपाळ राम आढाव यांच्या ऊसाच्या शेतालगत शेळ्या-मेंढ्या चारत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घालत धोंडीभाऊ भगवंता शिंदे यांच्या डोळ्यादेखत एका शेळीवर हल्ला केला. नरडीचा घोट घेत बिबट्याने क्षणातच त्या शेळीला फरफटत दाट ऊसाच्या शेतात ओढून नेले. हा थरारक प्रसंग पाहून परिसरातील नागरिक सुन्न झाले. घटना इतकी अचानक व भीषण होती की आरडाओरड करूनही बिबट्याने कोणतीही भीती न बाळगता शेळीला उचलून नेले. हा प्रसंग पाहून मेंढपाळ भयभीत झाला. परिसरात ऊस, दाट झाडी व गवत मोठ्या प्रमाणात असल्याने बिबट्याला मुक्त संचार मिळत असून तो मानवी वस्तीत सहज शिरकाव करत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. या परिसरात यापूर्वीही बिबट्या दिसल्याच्या घटना घडूनही ठोस उपाययोजना न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. लहान मुले, महिला व शेतमजूर जीव मुठीत धरून वावरत असून संपूर्ण परिसरात दहशतीचे सावट पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याच्या बंदोबस्तासाठी संबंधित ठिकाणी पिंजरा लावण्यात आला आहे. मात्र, केवळ पिंजरा लावून समस्या सुटणार नाही. रात्रीची गस्त वाढवणे, परिसरात प्रकाश व्यवस्था (उजळणी) करणे तसेच कायमस्वरूपी व प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.




**एकट्याने शेतात जाणे टाळा. जनावरे उघड्यावर सोडू नका. संध्याकाळनंतर लहान मुलांना घराबाहेर पाठवू नका. परिस्थिती अतिशय गंभीर आहे. प्रत्येकाने स्वत:ची व कुटुंबाची काळजी घ्यावी.**
**– चंद्रकांत मरकड,** वनरक्षक

**घटनेनंतर सरपंचांनी वनपरिक्षेत्राधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याने पिंजरा लावण्याची तातडीची गरज व्यक्त करण्यात आली. त्यानंतर वनपरिक्षेत्राधिकारी दिपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाची पथके परिसरात तैनात करण्यात आली असून बिबट्याच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी अत्यंत सजग राहावे. सरपंच मोहनराव आढाव यांनी केले आहे.**

# मतदान, मतमोजणीवर सीसीटीव्हीची करडी नजर

## आचारसंहिता भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई




**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगचे माननीय मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने यांनी मतदान व मतमोजणी प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. गुरुवार, दिनांक १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेचा तसेच शुक्रवार, ता. १६ जानेवारी रोजी होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी त्यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकीस निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त विजयकुमार मुंडे, निवडणूक आरओ अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने यांनी दिले. मतदान व मतमोजणी केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सातत्याने नजर ठेवण्यात येणार आहे. मतदान केंद्राबाहेर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच मतदानाच्या दिवशी विद्युत पुरवठा सुरळीत राहावा यासाठी विद्युत विभागाशी समन्वय साधण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. मतदान प्रक्रियेदरम्यान मतदारांकडे मोबाईल आढळून आल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच राजकीय पक्षांना मतदान केंद्राबाहेर बूथ उभारण्यासाठी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचेही सांगण्यात आले. पोस्टल मतदान तसेच मतमोजणी प्रक्रिया पूर्णतः पारदर्शकपणे पार पाडण्याचे आदेश देण्यात आले असून, आचारसंहिता भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही निवडणूक निरीक्षकांनी दिला. दरम्यान, निवडणूक अधिकारी आयुक्त यशवंत डांगे यांनी शहरातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती दिली. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
**- संपर्क -**
**९०११११३७००**

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# कोपरगावचा विकास इंदौरच्या धर्तीवर व्हावा- कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव शहरवासीयांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष व बहुमताने निवडून दिलेल्या नगरसेवकांवर जो विश्वास टाकला आहे, त्याला कुठेही तडा जाऊ न देता पालिका सत्ताधाऱ्यांनी इंदौर, विशाखापटणमसारख्या प्रगत शहरांच्या धर्तीवर कोपरगावचा विकास करावा व जिल्ह्यात पालिकेचा कारभार नावलौकिकास्पद करावा, असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी केले.

मकरसंक्रांतीच्या निमित्ताने कोपरगाव नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशुर तसेच स्वीकृत नगरसेवक अतुल काले व सोनल अजमेरे यांचा सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळी संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना बिपीन कोल्हे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

बिपीन कोल्हे पुढे म्हणाले की, माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी कोपरगावच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिले. वाढत्या लोकसंख्येला पूरक अशी दूरदृष्टी ठेवून त्यांनी विकासाची धोरणे राबविली. भाजप-रिपाई मित्रपक्ष लोकसेवा आघाडीच्या हाती पालिकेची सत्ता दिल्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी आली आहे.

शहरवासीयांना मुबलक पाणीपुरवठा, स्वच्छ व सुंदर शहर, दर्जेदार व धुळमुक्त रस्ते यांसारख्या मूलभूत सुविधा देण्यासाठी सर्व नगरसेवकांनी कटिबद्ध राहावे. इंदौर, विशाखापटणमसारख्या शहरांतील सुविधा व प्रशासनपद्धतीचा अभ्यास करून शासकीय व निमशासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. सत्कारास उत्तर देताना नगराध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले की, युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका निवडणुकीत जनतेसमोर मांडलेल्या विश्वासनाम्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे केली जाईल. उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशुर यांनी, कोल्हे कुटुंबियांनी आपली उपनगराध्यक्षपदी निवड करून आंबेडकरी चळवळीचा मोठा गौरव केल्याचे सांगितले. स्वीकृत नगरसेवक अतुल काले व सोनल अजमेरे यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला सार्थ ठरवून शहराच्या विकासासाठी जाणीवपूर्वक योगदान देण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संचालक बाळासाहेब वक्ते यांनी आभार मानले.

# महिलांनी जपली संक्रांतीची खास परंपरा

## राशिफल, तिळगुळ व उखाण्याचा आनंद



**नगर तालुका । रयत समाचार**

मकर संक्रांत हा हिंदू सणांमध्ये नवीन वर्षातील पहिला सण मानला जातो. सूर्याच्या उत्तरायणाचा हा सण महाराष्ट्रात तिळगुळ, हळदी-कुंकू, पतंगबाजी आदी पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. आजच्या धावपळीच्या जीवनातही अहिल्यानगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे महिलांनी संक्रांतीची एक अनोखी व खास परंपरा जपून ठेवली आहे. संक्रांतीच्या आदल्या दिवशी म्हणजे भोगीच्या दिवशी गावातील गुरु अशोक देशपांडे हे गावात घरोघरी जाऊन येणाऱ्या वर्षातील संक्रांतीविषयी तसेच प्रत्येक महिलेचे राशिफल सांगतात. यावर्षीही ही परंपरा गावातील महिलांनी मोठ्या उत्साहात जपली. भोगीच्या दिवशी सकाळपासूनच देशपांडे गुरु यांनी गावातील प्रत्येक गल्लीत जाऊन महिलांना संक्रांतीचे महत्त्व आणि राशिफल सांगितले. महिलांनी आपल्या घरातील सदस्यांचे राशिफल गुरूकडून समजावून घेत येणारे वर्ष सुख-समाधानाचे जावे, यासाठी मनोकामना केल्या. यावेळी उपस्थित महिलांनी एकमेकींना तिळगुळ वाटत उखाणे घेतले. प्रेमळ, विनोदी व रोमँटिक उखाण्यांमुळे परिसरातील वातावरण आनंदी झाले. जुन्या पिढीतील महिलांचे उखाणे नव्या पिढीकडे हस्तांतरित होत असल्याचे सुंदर चित्र यावेळी पाहायला मिळाले. या निमित्ताने महिलांनी एकमेकींशी सुख-दुःखाची देवाणघेवाण करत मन मोकळे केले. पिंपळगाव माळवीतील ही परंपरा केवळ सण साजरा करण्यापुरती मर्यादित नसून, महिलांच्या सामाजिक बंधनांना बळ देणारी, विनोद व सांस्कृतिक वारसा जपणारी ठरते. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांसाठी संक्रांत हा सण अधिक रंगतदार व अर्थपूर्ण ठरत आहे.

# खेळातूनच जीवनमूल्यांची जडणघडण- नितीन कोल्हे

## संजीवनी सैनिक स्कूल वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**कोपरगाव । किसन पवार**

खेळ म्हणजे केवळ शारीरिक ताकद, विजयपराजय किंवा स्पर्धा एवढाच मर्यादित विषय नसून तो मानवी मूल्यांची जोपासना करणारी जीवनशाळा आहे. खेळातून संघभावना, संयम, शिस्त, सहकार्य तसेच हारजीत समतोलपणे स्वीकारण्याची ताकद मिळते. ''मी''पेक्षा ''आपण'' ही भावना खेळामुळे अधिक दृढ होते, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी केले. ते संजीवनी सैनिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विश्वस्त सुमित कोल्हे, डी. एन. सांगळे, प्राचार्य कैलास दरेकर, विजय भास्कर उपस्थित होते. प्रारंभी डी. एन. सांगळे यांनी सर्वांचे स्वागत करून अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे व विश्वस्त सुमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी संस्था शैक्षणिक, क्रीडा व सैनिकी प्रशिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे नमूद केले. नितीन कोल्हे पुढे म्हणाले की, सैनिकी शिक्षणात शारीरिक कसरती, कवायती, शिस्तबद्ध दिनक्रम व खेळ यांचा समन्वय साधला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तंदुरुस्तीबरोबरच मानसिक कणखरपणा, नेतृत्वगुण, संघभावना व देशभक्तीची भावना विकसित होते. क्रीडा स्पर्धांमधील नियोजन, शिस्त व नियमबद्धता हीच मूल्ये सैनिकी शिक्षणातही केंद्रस्थानी असून खेळ व सैनिकी शिक्षण एकमेकांना पूरक ठरून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवितात. यावेळी संजीवनी सैनिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या ब्रास बँड संघाच्या उल्लेखनीय यशाचा विशेष गौरव करण्यात आला. हा संघ सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र राज्यस्तरीय विजेता ठरला असून यावर्षी विभागीय स्पर्धेतही विजय मिळवत दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सात राज्यांच्या पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या स्पर्धेत संजीवनीचा संघ पश्चिम विभागाचे नेतृत्व करणार असल्याने संस्थेची अग्रगण्य शैक्षणिक ओळख अधिक दृढ झाली आहे. या प्रसंगी २९ कलाकारांच्या ब्रास बँड पथकाने



देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पथकाचे मार्गदर्शक संगीत शिक्षक महेश गुरव यांचा विशेष गौरव करण्यात आला. ब्रास व ताल वर्गवारीतील २९ अद्ययावत वाद्यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती, तालबद्धता व सांघिक सुसूत्रतेचे प्रशिक्षण दिले जात असल्याचे सुमित कोल्हे यांनी सांगितले.

# आव्हाणे येथे 'खेळ पैठणीचा' कार्यक्रमाचे आयोजन

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

मकर संक्रांत व हळदी कुंकूच्या पारंपरिक उत्सवाला अविस्मरणीय रंग देण्यासाठी शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु. येथे महिलांसाठी खास 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, ता. १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम आव्हाणे गणपती मंदिराजवळ उत्साहात पार पडणार आहे. माजी पंचायत समिती सदस्या मनिषा संजय कोळगे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमात क्रांतीनाना मळेगावकर प्रस्तुत 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' हा लोकप्रिय उपक्रम रंगणार आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा परिषद माजी अध्यक्षा राजश्री चंद्रशेखर घुले व तेजस्विनी क्षितिज घुले उपस्थित राहणार असून, सुप्रसिद्ध अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर आणि टीव्ही स्टार बालगायिका सह्याद्री मळेगावकर यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत अधिक वाढणार आहे. या कार्यक्रमात सहभागी महिलांसाठी आकर्षक बक्षिसांची लयलूट ठेवण्यात आली आहे. प्रथम बक्षीस वॉशिंग मशीन, द्वितीय बक्षीस कुलर, तृतीय बक्षीस शिलाई मशीन, चतुर्थ बक्षीस फॅन, तर पाचव्या क्रमांकासाठी १५ पैठणी साड्या अशी बहुमोल पारितोषिके विजेत्यांची वाट पाहत आहेत. पारंपरिक संस्कृती, आनंदी खेळ, महिलांचा उत्साह आणि पैठणीचा सन्मान यांचे सुंदर संमेलन म्हणजे हा कार्यक्रम असून महिलांनी एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा करावा, सहभागातून आत्मविश्वास व गौरव अनुभवावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमात जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे व माजी पंचायत समिती सदस्या मनिषा कोळगे यांनी केले आहे.



# शरदचंद्र पवार होमिओपॅथीकमध्ये राष्ट्रीय युवा दिन साजरा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

वडाळा महादेव येथील शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुलनाचे चेअरमन डॉ. बाळासाहेब पवार यांच्या संकल्पनेतुन व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रिझवान अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजना स्वामी विवेकानंद जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन व राजमाता जिजाऊ भोसले जयंती निमित्त प्रतिमा पूजन पर कार्यक्रम घेण्यात आला. या दिनानिमित्त महाविद्यालयात वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. डॉ. सुचिता भट्टड म्हणाल्या की, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनामध्ये घडलेल्या संघर्षाचा आजच्या युवा पिढीने कशाप्रकारे बोध घ्यावा. गुरुप्रती असलेली सं विद्यार्थ्यांनी या दिवसाचे औचित्य साधून भाषणे सादर केली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रिझवान अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद विजय पवार, शुभांगी केदार, महेश कोकाटे, मुनइझा शेख, पियुष आचलिया, समर रणसिंग, दीप्ती गाडेकर, हीना जातु, मीनाक्षी शिंगवी, मिसबा खान उपस्थित होते. कार्यक'माचे सूत्रसंचालन यशराज कोळसे याने केले. आभार प्रदर्शन डॉ. मारिका घेरडे यांनी केले.

# गडाख परिवार राजकारण नाही, तर एक विचारधारा- राजश्री घुले

**नेवासा । विजय खंडागळे**

नेवासा तालुक्यातील विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा सन्मान करणारा सावित्रीबाई लेक गौरव पुरस्कार तसेच निराधार महिलांना आर्थिक मदत व अनेक कुटुंबांना मायेची सावली देणारा आधार म्हणजे केवळ राजकारण नसून गडाख परिवाराची सामाजिक विचारधारा आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले यांनी केले. त्या ताईसाहेब कदम स्मृतिदिनानिमित्त सेवाभावी फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर व शारदाताई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोनई महाविद्यालय येथे आयोजित सावित्रीबाई लेक गौरव पुरस्कार प्रदान व निराधार महिलांना साहित्य वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या माजी सभापती सुनिता गडाख होत्या. समाजातील निराधार कुटुंबांना मदतीची गरज, साहित्यिक यशवंतराव गडाख यांचे संस्कार, शिस्तप्रिय लेखनातून त्यांनी भावी पिढीला दिलेली दिशा, त्यांची प्रेरणा व ऊर्जा घेऊन हा उपक्रम दरवर्षी राबविला जात असल्याचे घुले यांनी नमूद केले. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम सातत्याने सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक मनोगत व्यक्त करताना सुनिता गडाख म्हणाल्या की, तालुक्यातील २४२ निराधार कुटुंबांना आतापर्यंत २० लाख रुपयांहून अधिक आर्थिक मदत देण्यात आली आहे. छोटी मदत ही मोठ्या भावनेतून दिली जाते आणि वृद्धापकाळात आठवण राहणारी ठरते. हे संस्कार गडाख कुटुंब व माजी मंत्री शंकरराव गडाख यांचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ताईसाहेब कदम, सावित्रीबाई फ ुले, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पुरस्कारार्थींचा राजश्री घुले, सुनिता गडाख, सरोज गडाख, जया गडाख तसेच मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच गरजू निराधार महिलांना आर्थिक मदत देण्यात आली. या कार्यक्रमास निलेश जोशी, बाळासाहेब पाटील, कारभारी जावळे, पूजा शिंदे, पत्रकार विनायक दरदले, विजय खंडागळे, आशा कर्डीले, नर्मदा अभंग, पार्वती जावळे, दुर्गा लीगायत, शर्मिला शिंदे, शोभा तागड, प्रतिभा चौधरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वाघ यांनी केले तर आभार उषा गडाख यांनी मानले.



# मकर संक्रांत पर्वकाळात मोहटादेवी लघुरुद्राभिषेक संपन्न

**पाथर्डी । नितीन गटाणी**

मकर संक्रांत पर्वकाळामध्ये पहाटे ५.०० वाजता मोहटादेवी देवस्थान येथे तीर्थजलाने लघुरुद्राभिषेक करून महापूजा करण्यात आली. मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. या पर्वकाळाचे विशेष महत्त्व लक्षात घेऊन दरवर्षीप्रमाणे मोहटादेवी देवस्थानच्या वतीने देवीस लघुरुद्राभिषेकाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ब्रह्ममुहूर्तावर वेदोक्त मंत्रांच्या जयघोषात पूजेला सुरुवात झाली. तिळाचे विविध अलंकार, विविध पुष्पांचे हार अर्पण करण्यात आले. तिळाच्या लाडवांचा नैवेद्य समर्पण करून देवीची आरती करण्यात आली. भाविक भक्तांना तिळगुळ देऊन प्रेमभाव हा जीवनात महत्त्वाचा आहे, असा संदेश देण्यात आला. यावेळी भारत राष्ट्र समृद्ध व्हावे तसेच जनमानसामध्ये ऐक्य व प्रेमभाव निर्माण व्हावा, असा संकल्प करून देवीस प्रार्थना करण्यात आली. लघुरुद्राभिषेक पूजेमुळे श्री मोहटादेवी गडावर चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. मकर संक्रांत पर्वकाळामध्ये हजारो महिला भाविक आपल्या सोबत हळद, कुंकू, शेतातील धान्य व फळे घेऊन मनोभावे देवीस वानवसा अर्पण करतात. वानवसा अर्पण करण्यासाठी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने देवीचा चांदीचा मुखवटा ठेवून महिला भाविकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. आलेल्या महिला व सर्व भाविकांसाठी देवस्थानकडून चहापाणी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्व भाविकांमध्ये आनंददायी वातावरण निर्माण झाले होते. मंदिर व परिसरामध्ये महिला भाविकांच्या मोठ्या गर्दीमुळे संपूर्ण परिसर गजबजून गेला होता. कार्यक्रमाचे पौराहित्य वे. भूषण साकरे, वे. भास्कर देशपांडे तसेच अहिल्यानगर येथील ११ पुरोहितांनी केले. यावेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, देवस्थानचे कर्मचारी, ग्रामस्थ व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलकडून कायरोप्रॅक्टिक उपचार शिबिराचे आयोजन

**अहमदनगर । आबीद खान**

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल व 'स्व केअर सेंटर' यांच्या संयुक्त विद्यमाने कायरोप्रॅक्टिक उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ता. १५ ते २० जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या शिबिरात मणक्यांचे विकार, पाठदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, सांधेदुखी, स्नायू ताण, सायटिका, मायग्रेन, ताणतणाव तसेच विविध शारीरिक वेदनांवर आधुनिक कायरोप्रॅक्टिक पद्धतीने उपचार केले जाणार आहेत. तसेच योग, ध्यान, प्राणायाम, नैसर्गिक उपचार आणि जीवनशैलीविषयक मार्गदर्शनही दिले जाणार आहे. हे शिबिर डॉ. स्वप्ना वाळकेकोठारी (एम.कॉम., बी.एड., एन.डी., डी. एच.एम.), प्रमाणित मेडिकल योगा इन्स्ट्रक्टर व हेल्थकेअर कोच यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. शिबिराचे आयोजन ''स्व केअर योगा अँड नॅचरोपथी सेंटर'', पहिला मजला, ओल्ड कोर्ट लेन, अहिल्यानगर येथे करण्यात आले असून सहभाग शुल्क प्रति व्यक्ती १०० रुपये ठेवण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी प्रकल्प प्रमुख म्हणून गिरीश मुळे कार्यरत असून अधिक माहितीसाठी ९८९०३४५८९३ किंवा ९८२२०१००८१ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी कायरोप्रॅक्टिक क्षेत्रातील तज्ज्ञांची विशेष टीम राजस्थानहून येणार आहे. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष सुनील कटारिया, सचिव अमर गुरप यांनी नागरिकांनी या शिबिराचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# इंडियन आर्मी डे



१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात, अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे. भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशातील परकीय आक्रमणे रोखून धरली. केवळ रोखून धरलीच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले. भारतीय लष्कराविषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात.

आज १५ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात इंडियन आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या.

भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटिश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला तत्कालीन फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे हा दिवस भारतीय लष्कर दरवर्षी आर्मी डे म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे. भारतीय लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती रक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भूमिका आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची नेहमीच स्तुती केली आहे. भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही. या संस्थेकडे एक परिपक्वता आणि जबाबदारीही आहे. भारतीय लष्कर हे आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्र नव्हे तर अमेरिका, रशिया, चीन यासारखी बलाढ्य राष्ट्रही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यास भारतीय लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्कराच्या सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात इंडियन आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा! तसेच देशासाठी शहीद झालेल्या भारतीय लष्कराच्या जवानांना विनम्र अभिवादन!! जय हिंद!!!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# बूथ हॉस्पिटलमध्ये आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर संपन्न

अहमदनगर । रयत समाचार

बूथ हॉस्पिटल येथे रोटरी क्लब अहिल्यानगर, एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, समता फाऊंडेशन, जिल्हा रुग्णालय व हिंद लॅब, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ता. ५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



शिबिराचे उद्घाटन बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर रविंद्र गायकवाड, एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाचे कार्यकारी संचालक परवेज बिलमोरिया, रोटरी क्लबचे नितीन थाडे तसेच उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. दि. साल्व्हेशन आर्मी इव्हँजलीन बूथ हॉस्पिटल, रोटरी क्लब, एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, समता फाऊंडेशन, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर तसेच पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयातील नेत्रतज्ज्ञ डॉ. उदय झुराळे व डॉ. आनंद बोज्जा, बूथ हॉस्पिटलचे बालरोगतज्ज्ञ डॉ. शेहनाज अय्युब, फिजिशियन डॉ. निकोल साल्डाना, मेडिकल ऑफिसर डॉ. मीना फुके व डॉ. राकेश थोरात, दंतचिकित्सक डॉ. ममता कांबळे, आहारतज्ज्ञ शीतल शिंदे, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. वृषाली महांडुळे यांनी २५० पेक्षा अधिक रुग्णांची आरोग्य व नेत्र तपासणी केली.

जिल्हा रुग्णालय अहिल्यानगरच्या लॅबमधील वैशाली कुलकर्णी व रोहन भांबळ यांनी रुग्णांच्या रक्ताच्या विविध तपासण्या मोफत केल्या. समता फाऊंडेशन व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या माध्यमातून शिबिरातील गरजू रुग्णांवर पुणे येथे मोफत नेत्रशस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. समता फाऊंडेशनचे अभिषेक शिंदे व श्री. वेदांत यांनी अहिल्यानगर शहर व उपनगरात जनजागृती केल्यामुळे या शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिर यशस्वी होण्यासाठी बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर रविंद्र गायकवाड, मेजर उषा गायकवाड, कॅप्टन डेनिसन परमार, स्नेहालय भिंगार बालभवनचे समन्वयक अंजुम शेख, समता फाऊंडेशन व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयचे अभिषेक शिंदे, ब्रदर अमित पठारे, श्री. वेदांत, संजय कुलकर्णी, प्रसाद ताठे, हर्षद बनसोडे तसेच बूथ हॉस्पिटल नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थी परिचारक व परिचारकांचे सहकार्य लाभले. शिबिर उद्घाटनाचे सूत्रसंचालन ब्रदर प्रविण साबळे यांनी केले.

# रोटरीच्या शिबिरात ८९ जणांचे रक्तदान

## ९३ जणांची मोफत आरोग्य तपासणी

अहमदनगर । आबीद खान



झेन इलेक्ट्रिक कंपनीचे कार्यकारी संचालक व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे माजी अध्यक्ष राजूभाई गुजर यांचे वडील कै. गोपालभाई गुजर यांच्या स्मरणार्थ ग्रुप ऑफ झेन इलेक्ट्रिक कंपनी, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, स्नेहालय व आमी संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीर झेन इलेक्ट्रिक कंपनी, एमआयडीसी अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. झेन इलेक्ट्रिक कंपनीतील अधिकारी व कर्मचारी, स्नेहालयचे सहकारी, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे सभासद, आमी संस्थेतील सहकारी तसेच समाजातील जवळपास १०० नागरिकांनी या शिबिरात सहभाग नोंदविला. यामधून ८९ रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या असून ९३ जणांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला. या यशस्वी रक्तदान शिबिरासाठी सर्व रक्तदाते, आयोजक व सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थांचे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष सुनील कटारिया यांनी आभार मानले. यावेळी ते म्हणाले, ''रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आयुष्यात एकदा तरी रक्तदान करावे. त्यामुळे गरजू व्यक्तींचे प्राण वाचतात आणि रक्तदात्यालाही आत्मसंतोष मिळतो.'' याप्रसंगी झेन इलेक्ट्रिक कंपनीचे कार्यकारी संचालक व रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष राजूभाई गुजर, कंपनीचे इतर संचालक, अधिकारी, कर्मचारी, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे सचिव अमर गुरप, हरीश नय्यर, राजेश परदेशी, प्रसन्न खाजगीवाले, ईश्वर बोरा, हितेश गुप्ता, विनोद बोरा, गणेश शहा तसेच स्नेहालयचे सहकारी व आमी संस्थेचे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते. या शिबिरासाठी साई सेवा ब्लड सेंटरच्या डॉक्टरांनी व सहकारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले. या सर्वांचे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.



# पिंपळगाव माळवीत मकरसंक्रांती उत्साहात साजरी

नगर तालुका । रयत समाचार

पिंपळगाव माळवी येथे मकर संक्रांतीचा सण आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावातील महिलांनी विशेष उत्साह दाखविला असून सकाळपासूनच स्थानिक मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सकाळी लवकर उठून महिलांनी घराघरात तिळगुळ, पुरणपोळी, हलवा यांसारखे पारंपरिक पदार्थ तयार केले.

'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला' ही परंपरा पाळताना गावकऱ्यांनी एकमेकांना तिळगुळ वाटून गोड बोलत सणाचा आनंद द्विगुणित केला. विशेषतः महिलांच्या गटाने हळदीकुंकू व तिळगुळ वाटपाचे आयोजन केले होते. गावातील श्रीराम मंदिर, महादेव मंदिर, गणपती मंदिर व सावता महाराज मंदिर येथे महिलांची विशेष गर्दी दिसून आली. महिलांनी नवीन साड्या नेसून एकमेकींना हळदी-कुंकू लावत पारंपरिक गाणी गाऊन हा सण साजरा केला. उत्तरायणाची सुरुवात होत असून आता सुख-समृद्धी येईल, अशी भावना यावेळी महिलांनी व्यक्त केली.

# सकस साहित्य समाजाची प्रतिमा उंचावते व योग्य दिशा देते- रतीलाल चौधर

## चौथ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनातून सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचा जागर

नगर तालुका । रयत समाचार



स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती तसेच राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात ज्येष्ठ व नवोदित साहित्यिक, कवी, शाहिर व कथाकथनकार यांच्या विचारांची समृद्ध मैफल रंगली. साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन, संस्कार व एकोप्याचा संदेश देत या संमेलनाने ग्रामीण भागात वैचारिक चळवळीचा जागर केला. हे संमेलन मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि श्री नवनाथ युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. संमेलनाचे उद्घाटन वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक व राष्ट्रपती पोलीस पदक विजेते रतीलाल चौधर आणि अभिनेत्री गौरी रत्नपारखी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रारंभी गावातील शहीद स्मारकास भेट देऊन शहीद जवान गोरख जाधव यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी स्वागताध्यक्ष कवयित्री सरोज आल्हाट, संमेलनाध्यक्ष साहित्यिक सुभाष सोनवणे, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे सचिव अँड. राजेश कावरे, राष्ट्रीय लोककलावंतचे संस्थापक अध्यक्ष संदीपकुमार बोरकर, संमेलन संयोजक पै. नाना डोंगरे, सरपंच उज्वलाताई कापसे, कवी संमेलनाध्यक्ष आत्माराम शेवाळे, ज्येष्ठ कवी आनंदा साळवे, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, साहेबराव बोडखे, लक्ष्मण चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. संमेलनात युवकांनी उत्स्फूर्त रक्तदान केले, तर महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महिलांचा हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. महिलांना वाण म्हणून राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर आधारित पुस्तके देण्यात आली. काव्य व शाहिरीच्या माध्यमातून 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा', सार्वजनिक स्वच्छता, संस्कार व सामाजिक जबाबदारी यावर आधारित काव्य व पोवाड्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मार्गदर्शन करताना रतीलाल चौधर म्हणाले की, सकस साहित्य समाजाची प्रतिमा उंचावते व योग्य दिशा देते. गावातील तंटे गावातच मिटले पाहिजेत. त्यासाठी तंटामुक्ती समिती, महिला दक्षता कमिटी व ग्रामसुरक्षा दलाची निर्मिती आवश्यक आहे. पोलीस सेवेत अनेक गावांना तंटामुक्त करून बक्षिसे मिळवून दिल्याचे व कौटुंबिक कलह सोडवून अनेकांचे संसार पुन्हा जुळविल्याचा अनुभव त्यांनी सांगितला. संमेलनाध्यक्ष सुभाष सोनवणे म्हणाले की, ग्रामीण साहित्य संमेलनातून गावांना विकासाची दिशा मिळते. राजकारण विचारहीन होत असताना साहित्यिक व विचारवंतांनी समाजासाठी दीपस्तंभाची भूमिका बजावणे आवश्यक आहे. अभिनेत्री गौरी रत्नपारखी यांनी ग्रामीण भागात साहित्य संमेलन घेण्याचे धाडस कौतुकास्पद असल्याचे सांगितले. मोबाईलच्या युगात साहित्य मागे पडत असताना ग्रामीण भागात साहित्याची खरी गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कवयित्री सरोज आल्हाट म्हणाल्या की, दरवर्षी कवितेच्या उत्सवातून सामाजिक चळवळीचे जागरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कविता हा साहित्याचा गाभा असून ती जीवनाचे विविध पैलू उलगडते व माणसाला नैराश्यातून बाहेर काढते. अँड. राजेश कावरे यांनी अशा उपक्रमांतून साहित्याची धुरा पुढे नेत समाजाला संस्कार व दिशा देता येईल, असे मत व्यक्त केले. दुपारच्या सत्रात काव्यसंमेलन रंगले. यात अहमद शेख, संजय बोरुडे, सारिका नळकांडे, बाळासाहेब मुन्तोडे, रूपचंद शिदोरे, दिलीप कापसे, बाळासाहेब कोठुळे, मनिषा गायकवाड, गिताराम नरवडे, निवृत्ती म. कानवडे आदी कवींनी सहभाग घेतला. कथाकथनकार बाळासाहेब देशमुख यांनी 'मानवतेचा धर्म' या विषयावर व्याख्यान दिले, तर शिवशाहीर शिवाजी थिटे यांनी पहाडी आवाजातील पोवाड्यांनी रसिकांची दाद मिळवली. रक्तदान करणाऱ्या युवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात पै. नाना डोंगरे यांनी संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात सुरू असलेल्या साहित्य चळवळीची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप रासकर यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, ग्रंथालय विभाग (महाराष्ट्र) संचालक अशोक गाडेकर, न्यू अर्पण ब्लड बँकेच्या डॉ. भाग्यश्री पवार यांचे मार्गदर्शन लाभले. स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला.

# अवसायकाकडूनही सुटेना मुळा प्रवरा वीज संस्थेचा तिढा

## सभासद गाफील, कोट्यवधी रुपयांवर पाणी

श्रीरामपूर । शफीक बागवान

मुळा प्रवरा वीज सहकारी संस्थेवर त्रिसदस्यीय अवसायक मंडळ नियुक्त होऊन वर्ष उलटले असतानाही अजून या संस्थेचा तिढा सुटला नाही. राहुरीचे सहाय्यक निबंधक रावसाहेब खेडकर हे या अवसायक मंडळाचे अध्यक्ष असून संदीप कोठुळे आणि प्रकाश सैंदाणे यांचा त्यात समावेश आहे. संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत ३१ जानेवारी २०२१ पर्यंत होती. डॉ. सुजय विखे हे तब्बल ७ वर्ष या संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. निवडणूक प्राधिकरणाने मतदार यादी कार्यक्रम तसेच अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करूनही संस्थेने निवडणूक राबविण्यास कसूर केल्याचा आरोप शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी करत प्रसिद्ध विधीज्ञ अजित काळे यांच्या मार्फत थेट औरंगाबाद खंडपीठाच्या उच्च न्यायालयात त्यावेळी याचिका दाखल केली होती. ही याचिका देखील तशीच पडून आहे.

त्यानंतर डॉ. विखे यांचे संचालक मंडळ पायउतार होऊन रावसाहेब खेडकर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून न्यायालयाने नियुक्ती केली होती. सध्या राज्यातील निवडणुकीचे सर्वत्र बिगुल वाजले आहेत. त्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या संस्थेची ही निवडणूक घेणे गरजेचे आहे. संस्थेची निवडणूक घेण्यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन व्हावे, असा विनंती अहवाल रावसाहेब खेडकर यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे जानेवारी २०२५ ला पाठविला होता. शासनाने संस्थेच्या बाबतीत वेगवेगळे त्रुटी काढून निवडणूक घेण्यासंदर्भातील अडचणींचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल तातडीने या कार्यालयास सादर करावा, असा आदेश बजावला होता. श्रीरामपूर आणि राहुरी या दोन तालुक्याच्या संपूर्ण कार्यक्षेत्रासह राहाता, नेवासा आणि संगमनेर तालुक्यातील काही गावे अशी सुमारे १८३ गावांचे कार्यक्षेत्र या संस्थेकडे होते. संस्थेचे सुमारे दीड लाखाहून अधिक सभासद आहेत. संस्थेला महावितरण कंपनीचे काही देणे आहे.



संस्थेच्या मालकीचे कोट्यावधी रुपयांचे इन्फ्रास्ट्रक्चर आजही तसेच उभे आहे. सन २०११ पासून या संस्थेला या जाळ्याच्या वापरापोटी महावितरण कंपनी कडून कोट्यावधी रुपयांचे भाडे मिळालेले आहे. सध्या हे भाडे बंद आहे. भाडे मिळावे यासाठी संस्थेने कोणताही प्रस्ताव दाखल न केल्यामुळे संस्था आणि लाखो सभासदांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान आजही सुरूच आहे.

तसेच संस्थेची सभासदांकडे देखील कोट्यावधी रुपयांची थकबाकी आहे. दरम्यान, संस्थेवर अवसायक मंडळ नियुक्त करण्यात आल्याने संस्थेच्या कार्यक्षेत्रात सभासदांमध्ये शोककळा पसरली आहे. अवसायकाकडून देखील या संस्थेच्या कामाचा अद्यापही निपटारा होऊ शकला नाही. संस्थेकडे मतदार यादी अद्ययावत आहे. संस्थेकडे निवडणूक घेण्यासाठी मनुष्यबळ नसले तरी शासनाने ठरविल्यास ते केव्हाही उपलब्ध होऊ शकते. संस्थेने अतिशय संघर्षातून आजपर्यंतची संपूर्ण वाटचाल केली आहे. संस्था आजही मालामाल आहे. ज्यांची कुणाची देणी असेल ती देणेही संस्था पूर्ण करेल. संस्था पुन्हा सुरू व्हावी, अशी संपूर्ण व्यवस्था आणि क्षमता तसेच सर्वच सभासदांची मागणी असताना ही संस्थेवर शासनाने अवसायक मंडळ नेमल्याने श्रीरामपूर व राहुरी तालुक्यातील लाखो सभासदांमध्ये असंतोष धगधगत आहे.